


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १७७ वा बुधवार दि २७ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# एकनाथ शिंदेंना आरक्षणाचं काम न करू दिल्याचा मनोज जरांगेंचा आरोप...

**वृत्तसंस्था/मुंबई**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलनाचं हत्यार उपसलं असून ते उद्या अंतरवाली सराटी येथून मुंबईकडे रवाना होणार आहेत. मुंबईत येण्याआधी जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर घणाघाती आरोप केले. एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीसांनी त्यांना आरक्षणाचं काम करू दिलं नाही, असा हल्लाबोल जरांगेंनी केला होता. या आरोपाला आता मुख्यमंत्री फडणवीस यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं असून आमच्यात कोणीही विस्तव टाकण्याचा प्रयत्न केला तरी आम्ही एक आहोत, असं फडणवीस म्हणाले. मनोज जरांगे पाटील यांच्या आरोपाबाबत विचारले असता देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एकनाथ शिंदे आणि माझ्यामध्ये कोणीही विस्तव टाकण्याचा प्रयत्न केला तरी आम्ही एक आहोत. एकनाथ शिंदे यांनीही असं काही झालं नसल्याचं सांगितलं आहे. कोणीही काडी टाकण्याचा आणि बांबू टाकण्याचा प्रयत्न केला तरी एकनाथ शिंदेंसोबत माझे चांगले संबंध आहेत,ङ्घङ्घ असा खुलासा फडणवीसांनी केला आहे. मनोज जरांगे हे २९ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदानात मराठा आरक्षणासाठी आमरण उपोषण सुरू करणार आहेत. जरांगे पाटील यांच्या या आंदोलनामुळे सरकारची कोंडी होण्याची शक्यता असून मुख्यमंत्र्यांनी याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. लोकशाहीत आंदोलन करण्याचा सर्वांना अधिकार आहे. त्यामुळे लोकशाही पद्धतीने कोणी आंदोलन करणार असेल तर सरकार कोणालाही रोखणार नाही. मात्र त्याचवेळी आता हिंदूंचा





सगळ्यात मोठा सण गणेशोत्सव आहे. या सणात कोणतंही विघ्न येऊ नये, अशी आमची अपेक्षा आहे, असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. दरम्यान, आम्ही मुंबईत पोहोचण्याआधी सरकारने आमच्या मागण्या पूर्ण कराव्यात, अन्यथा मी उपोषणाला बसणारच, असा निर्धार मनोज जरांगेंनी व्यक्त केला आहे. त्यामुळे सरकारकडून ही कोंडी फोडण्यासाठी काय प्रयत्न केले जातात, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

---

# श्रींच्या आगमनाची आज जोरदार तयारी, खरेदीची लगबग!

## ३०७ गावात एक गाव, एक गणपती!

**जनसंचलन/बुलढाणा**

गणेशोत्सवाचे आज आगमन होत असून, मंगळवारी बाजारपेठेत गणेश मुर्ती घरी आणण्यासाठी व स्वागतासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या खरेदीची लगबग दिसून आली. फुलांच्या माळा, सजावटीच्या रंगीबेरंगी झुंबर, मातीचे व कांस्याचे दीप, अगरबत्ती, तोरणे, शाडूमातीच्या मूर्ती, पूजेचे साहित्य खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी दिसून आली. मंगळवारी बाजारपेठेत सकाळपासूनच खरेदीदारांच्या रांगा लागलेल्या होत्या. सजावटीच्या दुकानात रंगीबेरंगी व पारंपरिक थीमच्या वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात आल्यात. घरगुती गणपतीसाठी छोटे देखावे, कृत्रिम तलाव, लायटिंग तसेच पर्यावरणपूरक सजावटीच्या वस्तूंनाही चांगली मागणी आहे. गणपतीच्या मूर्ती विक्रेत्यांकडेही शेवटच्या क्षणी गर्दी वाढली आहे. लाडक्या गणपती बाप्पाच्या स्वागतासाठी भाविकांनी सजावटीचे साहित्य खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. आकर्षक कृत्रिम फुलाच्या माळा व तोरण, थर्माकोल मंदिर, झिरमिळ्या, रिमझिम, लॉन, फुले आणि कमानी, कुंदन, टिकल्यांचा वापर केलेले झुंबर असे विविध प्रकारच्या साहित्याच्या खरेदीवर भाविकांचा भर आहे. आज २७ ऑगस्टला गणरायाचे आगमन होत आहे. गणरायाचे स्वागत करण्यासाठी गणेशभक्त उत्सुक आहेत. तत्पूर्वी घरासह परिसर स्वच्छ केला जात आहे. शहरात राहणाऱ्यांची पावले गावाकडे वळलेली आहेत. सार्वजनिक मंडळांनी सभामंडप उभारणीसह आकर्षक आरास निर्मितीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. गणेशोत्सव सजावटीसाठी गणेशभक्तांकडून नियोजन केले जात आहे. दुकानाबाहेर लटकवलेल्या रंगीबेरंगी फ ुलांच्या माळा या नागरिकांना आकर्षित करत आहेत. त्यामध्ये मणी आणि रंगीत धाग्याने बनवलेल्या माळांचादेखील समावेश आहे. सजावट अधिक आकर्षक आणि भरीव दिसावी यासाठी विविध रंगातील झिरमिळ्या उपलब्ध आहेत. विविध रंगातील प्लास्टिकची फुले विक्रीस उपलब्ध आहेत. विक्रेत्याकडून ग्राहकांच्या ग्राहकांच्या आवडीनुसार मखरासाठी लागणारी ुलांची कमान बनवून दिली जात आहे

# आता बुलढाण्याचे सहपालकमंत्री ना. संजय सावकारे!

**जनसंचलन/ बुलढाणा**

राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री ना. संजय सावकारे यांच्याकडील भंडारा जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा पदभार काढून बुलढाणा जिल्ह्याच्या सहपालकमंत्री पदी नियुक्ती करण्यात आली आहे.भंडाऱ्या जिल्ह्याचे पालकमंत्री आता पंकज भोयर झालेत. बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री सध्या मकरंद पाटील आबा आहेत. दरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निर्णयाने भंडारा येथील ना.संजय सावकारे यांना बुलढाणा जिल्ह्याच्या सहपालकमंत्री नियुक्ती देण्यात



आली आहे.भंडारा हे जाण्यासाठी दूर व अडचणीचे ठरत असल्याचे वृत्त आहे.तर काही स्थानिक भाजप नेत्यांच्या नाराजीमुळे त्यांची उचलबांगडी केली,अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगत आहे.

# शाश्वत मत्स्योत्पादनाची गरज

## संपादकीय लेख

भारतात मोठ्या प्रमाणात मासेमारी व्यवसाय होतो. या क्षेत्रात लाखो भारतीय नागरिक कार्यरत आहेत. मासळी उत्पादन क्षेत्रातून भारताला सन २०२३-२४मध्ये ७.३८ अब्ज डॉलर इतके परदेशी चलन प्राप्त झाले असून एकूण ६०,५२३ कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल मासळी निर्यातीतून झाली आहे. भारताला एकूण ११,०९८.८१ किमी क्षेत्राचा सागरी किनारा लाभला असून अकरा राज्ये मासळी व्यवसात कार्यरत आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतातून निर्यात होणाऱ्या मासळी मालांवर ५८.२६ टक्के इतका आयात कर लागू केला आहे. त्यातील ८.२६ टक्के कर हा सामुद्रिक पर्यावरणावर विपरीत परिमाण करून मासेमारी करत असल्याने अँटी डम्पिंग अँड काऊंटरव्हेलिंग टॅक्स अशा स्वरूपाचा आहे. भविष्यात भारतीय मासळी व्यवसायामध्ये या निर्बंधांचा किती दुष्परिणाम होतो, ते येणारा काळच सांगू शकेल. परंतु, सध्या तरी ट्रम्प यांनी लादलेल्या अवाढव्य कराचा सरळ फटका राज्यातील सर्व मच्छिमारांना बसणार नसून फक्त निर्यात करणाऱ्या व्यापाऱ्यांना बसणार आहे. त्यातही फ्रोझन कोळंबी आणि फ्रोझन माकूल माशांच्या निर्यातदारांना अधिक अर्थिक फटका बसणार आहे. याच काळात महाराष्ट्रातून अमेरिकेत ३,४०० टन मासळीची निर्यात झाली असून १११ कोटी परकीय चलन भारताला उपलब्ध झाले आहे आणि भारतातून अमेरिकेत एकूण ३३० लाख मेट्रिक टन मासळी निर्यात केली आहे. ज्यामुळे भारताला २० हजार ५०० कोटींचे परकीय चलन प्राप्त झाले आहे. या निर्यातीमध्ये ३ लाख टन फ्रोझन कोळंबी आणि २० हजार टन फ्रोझन माकुल माशांच्या निर्यातीचा समावेश आहे. केंद्रीय सागरी मत्स्यकी संशोधन केंद्र (सीएमएफआरआय) या शासकीय संस्थेने मागील आठवड्यात एक अहवाल जारी केला. भारताच्या सागरी मासेमारीत २०२४मध्ये एकूण ३.४७ दशलक्ष टन मासळीची नोंद झाली असून २०२३च्या तुलनेत २ टक्के इतकी किंचित घट झाल्याचे त्यात नमूद केले आहे. एकूण मासेमारीत गुजरातने ७.५४ लाख टनांसह आघाडी कायम ठेवली असून, त्यानंतर तमिळनाडू (६.७९ लाख टन) आणि केरळ (६.१० लाख टन) यांचा क्रमांक लागतो. पश्चिम बंगाल, तमिळनाडू आणि ओडिशा यांनी अनुक्रमे ३५ टक्के, २० टक्के आणि १८ टक्के वाढ नोंदवली. तथापि, कर्नाटक, गोवा आणि दमण-दादरा नगर हवेली या राज्यांमध्ये मासेमारीत लक्षणीय घट झाली. संस्थेच्या वार्षिक सागरी मासेमारी आकडेवारीनुसार, देशात सर्वाधिक उतरणारी मासळी म्हणून २.६३ लाख टनांसह बांगडा (इंडियन मॅकरल) प्रथम क्रमांकावर होती, तर तेलसरडे (ऑईल सार्डीन) २.४१ लाख टनांसह दुसऱ्या स्थानावर होते. संपूर्ण भारतभर, बांगडा, थ्रेडफिन ब्रीम्स, तेलसरडे, रिबनफिश, नॉन-पेनाईड कोळंबी आणि सेफालोपॉड यांच्या मासेमारीत २०२४मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत घट झाली. मात्र, लहान सारडे, पेनाइड कोळंबी, अँचोवीज आणि ट्युनीज यांच्या उतरणीत वाढ झाली. पश्चिम



किनाऱ्यावर एकूण मासेमारीत घट झाली, तर पूर्व किनाऱ्यावर वाढीचा कल दिसून आला. महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश मात्र यात अपवाद ठरले. एकूण २.५ लाख मासेमारी प्रवासांचे निरीक्षण करण्यात आले, ज्यामुळे देशभरातील मासेमारीचा प्रयत्न आणि उत्पादकता स्पष्ट झाली. यामध्ये यांत्रिक नौकांनी प्रतिप्रवास सरासरी २,९५९ किलो मासळी, मोटरयुक्त नौकांनी प्रतिप्रवास १७४ किलो आणि गैर-मोटरयुक्त नौकांनी केवळ ४१ किलो प्रतिप्रवास इतकी मासळी उतरवली. संस्थेच्या अहवालात नमूद केले आहे की डाना, फेंगल, रेमल आणि असना यांसारख्या चक्रीवादळांमुळे मासेमारीवर मोठा परिणाम झाला. चक्रीवादळामुळे मासेमारीत घट झाली. आंध्र प्रदेश आणि केरळ येथे वाढलेल्या उष्णतेच्या लाटांनीही मासेमारीला मोठा फटका बसला. महाराष्ट्र राज्याच्या मासळीसाठ्यात ४७ टक्क्यांनी वाढ झाली असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. सन २०२३मध्ये २.११ लाख टन एवढ उत्पन्न झाले होते आणि २०२४ साली यामध्ये वाढ होऊन ३.११ लाख टन एवढे मासळी उत्पादन झाले. मात्र उत्पादन वाढूनही राज्यातील मच्छिमार समाधानी नाहीत. मासळी उत्पादनातील ही वाढ शाश्वत मासेमारीमधून झालेली नाही, हे त्यामागील कारण. गुजरात राज्याच्या मासळी साठ्यात वाढ होत नसून हा मासळीसाठा वर्षानुवर्षे स्थिर राहत असल्याने गुजरातमधील मच्छिमारांचे भविष्य स्थिर राहणार आहे. येथील मासळी व्यावसायिक शाश्वत मासेमारीला प्रोत्साहन देत असल्याने गुजरातचा मासळीसाठा स्थिरावला असून महाराष्ट्र राज्याने गुजरातच्या धर्तीवर पावले उचलण्याची गरज आहे, अन्यथा हा व्यवसाय महाराष्ट्र गमावून बसणार असल्याची भीती आहे. गुजरात आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्यांचा सागरी भूगोल सारखाच आहे. पापलेट हा मासा गुजरात राज्यात प्रजनन करून महाराष्ट्रातील समुद्र क्षेत्रात वावर करतो, तर घोळ मासा वाढवण येथे प्रजनन करून गुजरातमध्ये वावरतो. विशेष म्हणजे, पापलेट हा महाराष्ट्राचा आणि घोळ हा गुजरात राज्याचा राज्य मासा म्हणून सरकारने घोषित केला आहे. असे असूनही दोन्ही राज्याच्या मासळी उलाढालीमध्ये ४ लाख टनांची तफावत आहे.

## गणेशोत्सव शांततेत आणि सामंजस्याने साजरा करा - जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

जनसंचलन/ बुलढाणा

गणेशोत्सव हा आनंदाचा आणि श्रद्धेचा सण आहे. यंदाच्या गणेशोत्सवाला राज्य महोत्सव हा दर्जा देण्यात आला आहे. हा महोत्सव शांततेत आणि सामंजस्याने साजरा करावा. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.







*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court.* 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# जरांगे पाटील मुंबईकडे निघण्याआधीच सरकारकडून पहिली मागणी मान्य

## आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष विखे पाटलांची मोठी घोषणा

**मुंबई:** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील हे २९ ऑगस्टपासून मुंबईत मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आमरण उपोषणाचं हत्यार उपसणार आहेत. जरांगे पाटील आणि त्यांचे हजारो समर्थक राजधानी मुंबईत धडकणार असल्याने सरकारची मोठी अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षणासंदर्भातील विविध मागण्या मान्य करत जरांगे पाटलांच्या आंदोलनाची धार बोथट करण्याचा प्रयत्न सरकारी पातळीवर सुरू असून आज मराठा आरक्षण उपसमितीची महत्त्वपूर्ण बैठक मंत्रालयात पार पडली. या बैठकीनंतर उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे. नव्याने गठीत करण्यात आलेल्या मराठा आरक्षण उपसमितीची आज पहिलीच बैठक होती. यापूर्वी आरक्षणासंदर्भात जी कार्यवाही झालीय त्यामुळे बऱ्यापैकी लोकांना मदत झाली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांसदर्भात आजच्या बैठकीत प्राथमिक चर्चा झाली. तसंच सातारा, हैदराबाद, बॉम्बे गव्हरमेंटच्या गॅझेटियरसंदर्भात त्यांची जी मागणी आहे त्याचा आज आढावा घेण्यात आला. सगेसोयऱ्यांबाबत असलेल्या मागणीवरही चर्चा करण्यात आली. बाकी वेगवेगळ्या कायद्याच्या प्रक्रिया सुरू आहेत. हैदराबाद गॅझेटियर आणि कुणबी नोंद शोधण्यासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या न्यायमूर्ती शिंदे समितीला



मुदतवाढ देण्यात यावी, अशी मनोज जरांगे पाटील यांची मागणी होती. आम्ही आजच्या पहिल्याच बैठकीत या समितीला सहा महिने मुदतवाढ देऊन जरांगे पाटलांची मागणी मान्य केली आहे,ङ्ख असं विखे पाटील यांनी सांगितलं आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांबाबत पुढे बोलताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, ङ्खमराठा आरक्षण लढ्यात मृत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील सदस्यांना सरकारी नोकरी देण्याची मागणी होती.

यातील अनेक जणांना नोकरी देण्यात आली असून फक्त नऊ जणांना नोकरी देणं बाकी असून पुढील तीन महिन्यांत ती प्रक्रिया पूर्ण केली जाईल. तसंच सानुग्रह अनुदान देण्याचं काम पूर्ण झालेलं आहे,ङ्ख असा दावा त्यांनी केला आहे. दरम्यान, ङ्खमराठा समाजाच्या मागण्यांसदर्भात आम्ही सर्वजण सकारात्मक आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तर मुख्यमंत्रिपदाच्या पहिल्या टर्ममध्ये मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र महाविकास आघाडीचं सरकार असताना कोर्टात ते आरक्षण टिकू शकलं नाही. पुन्हा महायुती सरकार आल्यानंतर आपण १० टक्के आरक्षण दिलं आणि ते सुप्रीम कोर्टात टिकूनही आहे. आरक्षणाच्या बाबतीत शासनाची कोणतीच भूमिका नकारात्मक नाही,ङ्ख असंही राधाकृष्ण विखे पाटील यावेळी म्हणाले.

# लालबाग राजा मंडळाला बीएमसीची नोटीस; २४ तासांत करावे लागणार हे काम, अन्यथा होणार कारवाई

**मुंबई** : गणेशोत्सवाची धामधूम सुरू झालेली असतानाच मुंबईसह राज्यातील अनेक भक्त लालबागच्या राजाची प्रतीक्षा करतात. दरवर्षी लालबागच्या राजाचे दर्शन घेणाऱ्या भक्तांची गर्दी वाढतच आहे. यंदा गणेशभक्तांसाठी प्रसाद म्हणून जेवणाची व्यवस्था करण्याचा निर्णय लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने घेतला आणि अन्नछत्र उभारले. मात्र येणाऱ्या भक्तांची सुरक्षिता पाहता मुंबई पोलिसांसह, अग्निशमन दलाने दिलेल्या नकारानंतरही उभारणी केल्याने त्याआधारे मुंबई महापालिकेच्या एफ दक्षिण वॉर्डकडून जागेच्या मूळ मालकांनाच मंगळवारी नोटीस बजावली. २४ तासांत अन्नछत्र काढा, अन्यथा कारवाई करून काढण्यात येईल, असा इशाराही दिला आहे. त्यामुळे बुधवारपर्यंत मुंबई महापालिका याची प्रतीक्षा करणार आहे.येणाऱ्या भक्तांच्या गर्दीचे नियोजन आणि सुरक्षित दर्शनासाठी साडेतीन हजारांपेक्षा जास्त कार्यकर्त्यांची फौजही आहे. तसेच महिला कार्यकर्ते आणि पोलिसही आहेत.यंदाचा उत्साह पाहता लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी येणाऱ्या गणेशभक्तांसाठी प्रसाद म्हणून जेवणाची व्यवस्था करण्याचा निर्णय मंडळाने घेतला आणि त्यासाठी जय्यत तयारीही केली. त्यासाठी लालबागमधील पेरू कंपाऊंडमध्ये तीन अन्नछत्र उभारण्याचा निर्णय घेतला. मात्र या अन्नछत्रात होणारी गर्दी आणि त्यामुळे चेंगराचेंगरीचा धोका आणि अन्य कायदा-सुव्यवस्था पाहता सुरक्षिततेच्या दृष्टीने त्याला मुंबई पोलिसांसह अग्निशमन दलानेही परवानगी देण्यास नकार दिला. तरीही अन्नछत्र उभारण्यात आले. त्यामुळे परवानगी नसतानाही अन्नछत्र उभारण्यात आल्याने मुंबई महापालिकेच्या एफ दक्षिण वॉर्डने त्याला नकार देत ज्या जागेत अन्नछत्र उभारले, त्या जागेच्या मूळ मालकालाच काम थांबवण्याची नोटीस बजावली आहे.सध्या ही जागा एका विकासकाच्या ताब्यात आहे. त्यामुळे एफ दक्षिण वॉर्डने नोटीस मालकालाच बजावून अन्नछत्र काढा, असे स्पष्ट केल्याचे महापालिकेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. मुंबई पोलिस आणि अग्निशमन दलाने परवानगी नाकारल्यानंतरच ही नोटीस वॉर्डकडून बजावण्यात आल्याचे सांगितले. एकावेळी ५०० पेक्षा जास्त जण या अन्नछत्रात प्रसाद घेऊ शकतील, अशी व्यवस्था केली जात होती.



मात्र सुरक्षिततेच्या कारणास्तव ती नाकारण्यात आली.अन्नछत्रासाठी उभारलेला मंडप, साहित्य त्वरित काढा, अशी नोटीस देताना त्यासाठी २४ तासांची मुदत दिल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. मंगळवारी ही नोटीस बजावली. बुधवारपर्यंत पेरू कंपाऊंडमधील अन्नछत्रासाठीचे शेड, अन्य साहित्य न काढल्यास महापालिका दुसरी नोटीस बजावेल. त्यानंतर स्वत: ही शेड व साहित्य काढणार आहे.मुंबई अग्निशमन दलानेही अन्नछत्र उभारणीला परवानगी नाकारली आहे. सुरक्षिततेच्या कारणास्तव परवानगी दिली नाही, असे अग्निशमन दलातील सूत्रांनी सांगितले. एकाच वेळी मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्यास त्याचे नियोजन नाही. पोलिसांनी आणि वॉर्डने परवानगी दिली, तरच अग्निशमन दलही परवानगी देईल. मात्र त्याबाबत अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आला नसल्याचे सांगण्यात आले

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पार्कचं काम सुरु असताना मोठी दुर्घटना, भिंत कोसळल्याने सातजण दबले; एकाचा मृत्यू

**सांगली :** सांगलीच्या मिरजेतील किल्ला भाग येथे सुरू असणाऱ्या खुशी पार्कचे बांधकाम कोसळल्याने भिंतीखाली सातजण दबले गेले. यामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला, तर एकाची प्रकृती चिंताजनक आहे, तर पाच जण गंभीर जखमी झालेत. किल्ला भागातील खुशी पार्कचे गेल्या अनेक दिवसांपासून बांधकाम सुरू होते. या ठिकाणी भिंतीचे बांधकाम सुरू असताना कामगारांच्या अंगावर भिंत कोसळली. त्यामुळे ही दुर्घटना घडली. ढिगार्याखालून सर्वांना तातडीने बाहेर काढून मिरज शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. परंतु यावेळी एकाचा जागीच मृत्यू झाला होता. तर एकाची प्रकृती चिंताजनक आहे.काही दिवलांपूर्वी जिल्ह्यात



एक भीषण अपघात झाला होता. गुहागर-विजापूर राष्ट्रीय महामार्गावर योगेवाडी, ता. तासगाव येथे एसटी बस आणि मालवाहू कंटेनर यांच्यात समोरासमोर भीषण धडक झाली. या अपघातात गणपतीपुळे येथे देवदर्शनासाठी जाणाऱ्या जाखापूर, ता. कवठेमहांकाळ येथील सहा महिला जखमी झाल्या असून, बसचालक गंभीर जखमी आहे. सर्व जखमींना तातडीने तासगाव ग्रामीण रुग्णालय आणि सांगली सिव्हील हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. हा अपघात सकाळी ११ ऑगस्ट रोजी सात वाजण्याच्या सुमारास योगेवाडी फाट्यावर घडला. कवठेमहांकाळ बस स्थानकाची ही एसटी बस जाखापूर येथील भाविकांना घेऊन गणपतीपुळे येथे देवदर्शनासाठी निघाली होती. विजापूर-गुहागर राष्ट्रीय महामार्गावर योगेवाडी येथे मालवाहू कंटेनरची व बसची समोरासमोर धडक झाली. धडक इतकी जोरदार होती की, बसच्या पुढील भागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अपघातामुळे बस आणि कंटेनर दोन्ही वाहनांचे गंभीर नुकसान झालं आहे.प्राथमिक तपासात असं दिसलं की, कंटेनरचा वेग जास्त असल्याने किंवा चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला असावा. तथापि, अपघाताचे नेमके कारण स्पष्ट करण्यासाठी तासगाव पोलिसांनी तपास सुरू केला आहे. कंटेनर चालकाची चौकशी सुरू असून, रस्त्याच्या अवस्थेचा आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन याचाही तपास केला जाणार आहे

## एकत्र काम करताना... ओंकार राऊतसोबतच्या नात्याबद्दल स्पष्टच बोलली प्रियदर्शिनी इंदलकर...

**मुंबई -** महाराष्ट्राची हास्यजत्रा हा लोकप्रिय कार्यक्रम असून त्यातील कलाकारसुद्धा कायम चर्चेत असतात. हास्यजत्रेतील कलाकार प्रोफेशनल आयुष्यासोबतच वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत असतात. हास्यजत्रा फेम ओंकार राऊत कायम त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असतो. अशातच काही वर्षापूर्वी ओंकार राऊत प्रियदर्शिनी इंदलकरसोबतच्या फोटोमुळे चर्चेत आलेला. ओंकार आणि प्रियदर्शिनीच्या अफेअरच्या चर्चा सुरू झाल्या. मात्र, त्यावर प्रियदर्शिनीने मौन सोडलं असून त्यांच्या नात्याबद्दल खुलासा केला आहे. ओंकार राऊत आणि प्रियदर्शिनी इंदलकर सोशल मीडियावर कायम चर्चेत असतात. ओंकार आणि प्रियदर्शिनी एकमेकांसोबतचे फोटो आणि व्हिडिओसुद्धा शेअर करतात. त्यामुळे त्यांच्या अफेअरच्या चर्चा वाऱ्यासारख्या पसरतात. प्रियदर्शिनीने शेअर केलेल्या एका फोटोमुळे ओंकार राऊत आणि ती रिलेशनशिपमध्ये असल्याचं म्हटलं जात होतं. त्यावर राजश्री मराठीला दिलेल्या मुलाखतीमध्ये प्रियदर्शिनीने खरं काय ते सांगितलेलं.मुलाखतीदरम्यान,





ओंकार राऊत आणि तुझा एकत्र असलेला फोटो व्हायरल होतोय सोशल मीडियावर तर तू काय बोलशील त्यावर? यासाठी चाहतेसुद्धा उत्सुक आहेत. असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर प्रियदर्शिनी म्हणाली की, माझा पहिलाच सिनेमा आहे. त्यामुळे इतक्या लवकर कशी काय कॉन्ट्रोव्हर्सी झाली? आस्तादने एक काहीतरी गंमतीशीर कॉमेंट केली त्यावर मी मस्करीत रिप्लाय केला. पण मला माहित नव्हतं की, त्या एका गोष्टीमुळे एवढं सगळं होईल आणि एवढी न्यूज होईल. पण असं काही नाहीये. आम्ही चांगले मित्र आहोत आणि एकत्र काम करताना मैत्री वाढत जाते. लोकांना आमच्यात प्रेम दिसतंय, तर लोकांचं प्रेम आहे खरंतर. पण, आमच्यात तसं काही नाहीये, वी आर गुड फ्रेंड्स. चालेल मला कॉन्ट्रोव्हर्सी, पण पहिलाच सिनेमा आहे त्यामुळे..दुसऱ्या तिसऱ्या सिनेमाला चालेल असं प्रियदर्शिनीने पुढे सांगितलेलंदरम्यान, प्रियदर्शिनी इंदलकरच्या वर्क फ्रंटबद्दल सांगायचं तर ती लवकरच दशावतार या सिनेमामध्ये झळकणार आहे. या सिनेमात दिलीप प्रभावळकर यांनी मुख्य भूमिका साकारली असून भरत जाधव, महेश मांजरेकर, अभिनय बेर्डे, सुनील तावडे यांसारखे कलाकार आहेत.

## अतिवृष्टीचा २.२२ लाख हेक्टरवरील पिकांना फटका

**अमरावती:** अतिवृष्टीमुळे विभागातील २६ जणांचा मृत्यू झाला आहे. यात अमरावतीतील दोन, अकोला तीन, यवतमाळ ११, बुलढाणा आठ व वाशीम जिल्ह्यातील दोघांचा समावेश आहे. मृतकांपैकी १६ कुटुंबीयांना ६४ लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. दहा प्रकरणे प्रलंबित आहेत.अतिवृष्टीमुळे अमरावती विभागातील अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम आणि यवतमाळ या पाच जिल्ह्यांत सुमारे २ लाख २२ हजार ४९४ शेतजमिनीवरील पिकांचे नुकसान झाले आहे. सर्वाधिक १ लाख १८ हजार हेक्टरवरील नुकसान बुलढाणा जिल्ह्यात झाले आहे.अमरावती जिल्ह्यातील तिवसा, अचलपूर, चांदूर बाजार, वरूड, दर्यापूर, अंजनगाव सुर्जी व चिखलदरा तालुक्यातील ११ हजार ३९० हेक्टर शेतजमिनीचे नुकसान झाले आहे. २९० गावांना पावसाचा फटका बसला. अकोला जिल्ह्यातील अकोला, पातुर या दोन तालुक्यांतील ६२ गावांत नुकसान झाले आहे. ४२५ हेक्टर जमीन खरडून गेली तर ३ हजार ७९० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील पुसद, महागाव, उमरखेड, घाटंजी, आर्णी, झरी-जामणी या पाच तालुक्यांना फटका बसला. जवळपास ७७ गावांतील ६५ हजार ४१५ हेक्टरवरील शेतजमिनीचे नुकसान झाले आहे.बुलढाणा जिल्ह्यात सर्वाधिक नुकसान झाले आहे. मेहकर, लोणार, सिंदखेड राजा, चिखली, खामगाव, जळगाव-जामोदला अधिक फटका बसला. सहा तालुक्यांतील २०९ गावे बाधित झाली आहेत. १ लक्ष १८ हजार ९३२ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. वाशीम जिल्ह्यातील वाशीम, रिसोड, मंगरूळपीर, मालेगाव, कारंजा, मानोरा या सहा तालुक्यांतील १२२ गावांना अतिवृष्टीचा फटका बसला. २२ हजार ९६७ हेक्टरवरील शेतजमिनीचे नुकसान झाले आहे.अतिवृष्टीमुळे विभागातील १६३ घरांची पूर्णत: पडझड झाली आहे. यात अमरावती जिल्ह्यातील ७३, अकोला १३, यवतमाळ ६४ तर बुलढाणा जिल्ह्यातील १३ घरांचा समावेश आहे. अंशत: पडझड झालेल्या पक्क्या घरांची संख्या ३६३, कच्चे ७,४७३, झोपड्या दोन तर बाधित गोठ्यांची संख्या १८४ इतकी आहे. अतिवृष्टीमुळे विभागातील २६ जणांचा मृत्यू झाला आहे. यात अमरावतीतील दोन, अकोला तीन, यवतमाळ ११, बुलढाणा आठ व वाशीम जिल्ह्यातील दोघांचा समावेश आहे. मृतकांपैकी १६ कुटुंबीयांना ६४ लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. दहा प्रकरणे प्रलंबित आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पाण्याने भरलेल्या खड्ड्यात बुडून मूकबधिर मुलाचा मृत्यू, बॉडी कुशित घेत आई तशीच बसून; पाहून सारे सुन्न

**नागपूर:** काटोल तालुक्यातील खानगाव पारधी बेड्यावर मंगळवारी सकाळी घडलेली घटना परिसराला हादरवून गेली. नगरपरिषदेच्या डम्पिंग साइटवरील पावसाच्या पाण्याने भरलेल्या खड्ड्यात बुडून १२ वर्षीय मूकबधिर मुलाचा विराट राणा पवार याचा मृत्यू झाला आहे. या घटनेने परिसरात शोककळा पसरली असून, स्थानिकांनी प्रशासनावर तीव्र संताप व्यक्त केला आहे.काटोल नगरपरिषदेने कचरा डम्पिंगसाठी मोठमोठे खड्डे खोदले होते. मात्र, त्यांची सुरक्षितता किंवा योग्य देखरेख केली नव्हती. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये मोठ्या



प्रमाणात पाणी साचले आणि परिसर धोकादायक बनला. याच खड्ड्यात पडून विराटचा जीव गेला. अपंगत्वामुळे आधीच संघर्षमय जीवन जगणाऱ्या या मुलाच्या मृत्यूने कुटुंबाचे दु:ख पाहून संपूर्ण परिसर सुन्न झाला होता. आई माधुरी पवार यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण समाजानेही या दुर्घटनेबद्दल तीव्र संपात व्यक्त केला आहे.याप्रकरणी स्थानिक रहिवाशांनी सांगितले की, ङ्कगेल्या अनेक वर्षांपासून या खड्ड्यांना बुजवण्याची मागणी केली जात आहे. आमदार, मंत्री आणि प्रशासनाकडे वारंवार निवेदन दिले, पण फक्त आश्वासने मिळाली. अखेर या निष्काळजीपणामुळे एका निरागस जीवाचा बळी गेला.ङ्क शुभांगी राजपूत, तरामती रेवतकर, हरिचंद्र राजपूत यांच्यासह नागरिकांनी नगरपरिषद आणि डम्पिंग कंपनीवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

या घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. याप्रकरणाचा प्राथमिक तपास सुरू असला तरी पारधी समाजाचा आग्रह आहे की, ङ्कही केवळ चौकशीपुरती मर्यादित राहू नये. दोषींना शिक्षा झाली पाहिजे आणि धोकादायक खड्डे तात्काळ बुजवले गेले पाहिजेत.ङ्कदरम्यान, नगरपरिषद आणि संबंधित कंपनीकडून कोणतीही प्रतिक्रिया मिळालेली नाही. मात्र, या घटनेने स्थानिक प्रशासनाच्या निष्काळजीपणावर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. विराटचा मृत्यू हा फक्त अपघात नसून, व्यवस्थेच्या त्रुटींचे ठळक उदाहरण ठरला आहे, असं म्हणत परिसरातील नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

## मराठा आरक्षणाचा मुद्दा, सरकारवर टीका, चिठ्ठी लिहून तरुणाने विष घेतलं, चलो मुंबईच्या पूर्वसंध्येला लातुरात भयंकर घडलं



**लातूर:** मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा पेटताना दिसत आहे. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील हे बुधवारी (२९ ऑगस्ट) मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईत उपोषणाला बसणार आहेत. त्यासाठी हजारो मराठा हे मुंबईत धडकणार आहेत. बुधवारी सकाळी आंतरवली सराटी येथून मनोज जरांगे पाटील मुंबईच्या दिशेने रवाना होणार आहेत. मात्र, त्याच्या पूर्वसंध्येला लातूरमध्ये धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अहमदपूर तालुक्यातील शिंदगी बुद्रुक गावातील बळीराम मुळे या ३५ वर्षीय युवकाने विष प्राशन करून आपल्या आयुष्याची अखेर करण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा पेटतो की काय अशी भीती व्यक्त करण्यात येते आहे. सरकार मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर वारंवार वेळकाढूपणा करत आहे, मनोज जरांगे यांच्यावर वारंवार उपोषणाची वेळ आणली जात आहे, अशा आशयाची चिठ्ठी खिशात ठेवून या व्यक्तीने हे टोकाचं पाऊल उचलल्याची माहिती आहेसध्या या व्यक्तीवर लातूर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती आहे. मनोज जरांगे पाटील यांनी दिलेल्या ङ्कचलो मुंबईफ्फच्या हाकेला प्रतिसाद देत राज्यभरातून मराठा समाजाचे लोक मोठ्या संख्येने आंदोलनासाठी मुंबईकडे निघाले असतानाच या घटनेमुळे समाजात संताप आणि हळहळ व्यक्त होत आहे.अहमदपूर तालुक्यातील बळीराम मुळे या युवकाने सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्यास असक्षम असल्याच्या कारणावरून विष प्राशन करत असल्याचे आपल्या आयुष्याची अखेर करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत नमूद केले आहे. सरकारने आतापर्यंत आरक्षणाचा मुद्दा संपवायला हवा होता. मात्र अद्याप आरक्षणाचे घोंगडे भिजत ठेवल्यामुळे हा पर्याय निवडत असल्याचे त्याने चिठ्ठीत नमूद केले आहे. यापूर्वी लातूर जिल्ह्यात अनेकांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आपले बलिदान दिले आहेत. त्यामुळे मराठा समाजात संतापाची भावना आहे.

# लाडक्या गणपती बाप्पाकडून घ्यावी ही मोलाची शिकवण!

भगवान गणेशाच्या कथांमधून शिकण्यासारखे अनेक आध्यात्मिक धडे असले तरी, काही धडे असे आहेत जे आपल्या दैनंदिन व्यावसायिक आणि वैयक्तिक जीवनात स्थान मिळवतात. चांगल्या सुरुवातीचा आणि बुद्धीचा देव मानला जाणारा, त्याच्या नावानेच नवीन उपक्रम हाती घेतले जातात आणि जीवनातील महत्वाचे निर्णय घेतले जातात. कारण बाप्पा स्वतःच्या आयुष्यातील अडथळे दूर करणे हा धर्म बनवला पाहिजे, व्यावसायिक जीवनात असो वा वैयक्तिक जीवनात, योग्य वृत्तीने - कधीही न हार मानण्याची वृत्ती - अगदी सर्वात दुर्गम वाटणारी अडचण देखील तुमचे जग कोसळल्याशिवाय हाताळता येते. तुम्हाला फक्त स्वतःवर विश्वास हवा आहे, हे



शिकवतो. पाहू या गणपती बाप्पाकडून काय मोलाची शिकवण आपण घेऊ शकतो.

**सर्वांसाठी नम्रता आणि आदर**

गणेशांचे वाहन उंदीर आहे, जो आपल्याला शिकवतो की आपण सर्वात लहान आणि कमकुवत प्राण्यांचाही आदर केला पाहिजे आणि सर्वांशी नम्र असले पाहिजे.

**पालकांचा आदर**

गणेशजी त्यांचे पालक, भगवान शिव आणि देवी पार्वती यांचे खूप आज्ञाधारक होते. यावरून आपण शिकतो की आपण नेहमीच आपल्या पालकांचा आणि वडिलांचा आदर केला पाहिजे, कारण ते योग्य मार्ग दाखवतात.

**बुद्धिमत्ता आणि हुशारी**

जेव्हा गणेशाला जगाला प्रदक्षिणा घालण्यास सांगण्यात आले तेव्हा त्याने हुशारीने त्याच्या पालकांना प्रदक्षिणा घालून आपली बुद्धिमत्ता दाखवली. यावरून असे दिसून येते की कोणतेही कार्य पूर्ण करण्यासाठी विचार करणे आणि हुशार असणे महत्त्वाचे आहे.

**अडथळ्यांना घाबरू नका**

गणपतीला विघ्नहर्ता म्हटले जाते, जे प्रत्येक अडथळा दूर करतात. त्यांची कहाणी आपल्याला शिकवते की आपण कोणत्याही शक्तिशाली अडथळ्याला घाबरू नये आणि आपले कर्तव्य बजावले पाहिजे.

**कर्तव्यनिष्ठा**

महाभारत लिहिताना गणेशाने एक दात तोडला आणि तो पेन म्हणून वापरला. याचा अर्थ असा की आपण एका महान कार्यासाठी स्वतःला समर्पित केले पाहिजे. आणि गणेशाचे मोठे कान ङ्कलंबकर्णङ्क चे प्रतीक आहेत. ते आपल्याला शिकवतात की आपण नेहमी इतरांचे लक्षपूर्वक ऐकले पाहिजे आणि नवीन कल्पनांना ग्रहणशील असले पाहिजे.

# पुण्यात महायुतीसमोर युतीचा पेच, काका-पुतणेही येऊ शकतात एकत्र...



**पुणे :** पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीत महायुती तील तिन्ही घटक पक्षांनी युती करून ही निवडणूक लढवली तर महायुतीतील मातब्बर बंडखोरांना महाविकास आघाडीतून निवडणुकीच्या मैदानात उतरावे लागणार आहे. महायुतीने एकत्रित निवडणूक न लढवल्यास पुण्यातील बहुतांश प्रभागांमध्ये भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्यातील संघर्ष हा चर्चे चा विषय ठरणार आहे. त्यामुळे महायुती पुढे येत्या काळात युती करण्याचा पेच कायम राहणार आहे. पुणे महापालिकेत सन २०१७च्या निवडणुकीत भाजपची एकहाती सत्ता होती. महापालिकेतील १६२ पैकी ९७ नगरसेवक हे भाजपचे निवडून आलेले होते. त्यानंतर झालेल्या पोटनिवडणुकांमध्ये दोनने वाढ होऊन भाजपच्या महापालिकेतील नगरसेवकांची संख्या ९९ झाली. भाजपचे ४१ प्रभागांपैकी १५ प्रभागांमध्ये चारही सदस्य निवडून आले होते. तर, सात प्रभागांमध्ये प्रत्येकी तीन असे २१ नगरसेवक निवडून आले होते. भाजपच्या विजयाचे गणित २२ प्रभागांमध्ये दडलेले होते. या २२ प्रभागांमधूनच ८१ नगरसेवक निवडून आले होते. भाजपचे ४१ प्रभागांपैकी ३४ प्रभागांमध्ये किमान एक तरी नगरसेवक निवडून आला होता. तर, उर्वरित सात प्रभागांमध्ये विरोधकांची ताकद दिसली होती. महापालिकेची नव्याने प्रारूप प्रभागरचना करताना विरोधी नगरसेवकांचे प्राबल्य असलेल्या सात प्रभागांमध्ये मोठे फेरबदल झाले आहेत.राष्ट्रवादी काँग्रेस गेल्या निवडणुकीत एकसंध असताना ४० नगरसेवक निवडून आले होते. राष्ट्रवादीचे खराडी-चंदननगर, मुंढवा मगरपट्टा; तसेच वारजे माळवाडी या तीन प्रभागांमध्ये प्रत्येकी चार असे १२ नगरसेवक निवडून आले होते. तर, आंबेगाव दत्तनगर-कात्रज गावठाण, धनकवडी-आंबेगाव पठार आणि कोंढवा खुर्द-मिठानगर या प्रभागांमध्ये प्रत्येकी तीन नगरसेवक निवडून आले होते. रामटेकडी-सय्यदनगर या तीन सदस्यीय प्रभागांमध्ये एक राष्ट्रवादी आणि दोन अपक्ष नगरसेवक निवडून आले होते. हे अपक्ष नगरसेवक राष्ट्रवादी बरोबर राहिले होते. त्यामुळे या प्रभागावरही राष्ट्रवादी चेच प्राबल्य राहिले होते. राष्ट्रवादीची बहुतांश ताकद ही वडगाव शेरी, हडपसर आणि खडकवासला विधानसभा मतदारसंघांत दिसली होती. राष्ट्रवादीतील फुटीनंतर ही एकत्रित ताकद कमी झाली आहे.महापालिकेच्या गत निवडणुकीत फुटीनंतर काँग्रेस आणि शिवसेनेच्या प्रत्येकी दहा जागा निवडून आल्या. शिवसेनेच्या नंतर यापैकी सात जणांनी आपआपला रस्ता शोधला. त्यातील पाच नगरसेवक हे भाजपमध्ये गेले आहेत. तर तीन नगरसेवक हे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात आहेत. उर्वरित दोन नगरसेवकांपैकी एक जण काँग्रेस, तर दुसरा शिवसेनेचा (एकनाथ शिंदे) शहरप्रमुख आहे. काँग्रेसच्या काही नगरसेवकांकडून भाजपमध्ये जाण्यासाठी चाचपणी करण्यास सुरुवात केली आहे.राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेतील फुटीनंतर स्थानिक पातळीवर राजकीय समीकरणे बदलली आहेत. भाजपचा मतदार एकसंघ राहिला असला तरी राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या मतदारांत फूट पडली आहे. पुण्यात भाजपने स्वबळाचा नारा दिल्यास दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येऊन भाजपला आव्हान देऊ शकतात. तशा हालचाली येत्या काळात सुरू होतील, असा दावा उच्चपदस्थ नेत्याने महाराष्ट्र टाइम्सकडे केला आहे. भाजप-राष्ट्रवादी ची युती झाली तर या दोन्ही पक्षांतील मातब्बर बंडखोरांना महाविकास आघाडीची दारे उघडी असणार आहेत. त्यामुळे महायुती पुढे आगामी काळात युती करायची की नाही, याचा पेच कायम राहणार आहे

# गणेशोत्सवादरम्यान पुणेकरांसाठी महत्त्वाचा निर्णय, दर तीन मिनिटांनी धावणार मेट्रो



**पुणे :** शहराच्या मध्य भागात गणपती पाहण्यासाठी भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (महामेट्रो) गणेशोत्सवातील गर्दीच्या वेळी स्वारगेट ते जिल्हा न्यायालय दरम्यान दर तीन मिनिटांनी मेट्रो सेवा उपलब्ध करून देण्यासाठी चाचपणी सुरू केली आहे. गेल्या दोन दिवसांपासून त्या दृष्टीने चाचणी घेतली जात आहे. यामुळे मंडई, कसबा पेठ येथील गर्दी कमी करण्यास मदत होणार आहे.पुण्यातील गणेशोत्सव राज्यासह परदेशातही प्रसिद्ध आहे. या ठिकाणचे गणपती व देखावे पाहण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक येतात. यंदा गणेशोत्सवात पहिल्यांदाच जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या मार्गावर मेट्रो सुरू असणार आहे. या मार्गावरील कसबा, मंडई, स्वारगेट ही मेट्रो स्थानके सुरू झाली आहेत. ही स्थानके नागरिकांना थेट मानाच्या गणपती मंडळांजवळ नेतात. त्यामुळे प्रवाशांना गर्दी टाळून मेट्रोने गणेशोत्सव पाहण्यासाठी जाता येणार आहे. नागरिक रात्री १२ पर्यंत देखावे, गणपती पाहण्यासाठी येतात. त्यामुळे महामेट्रोने पहाटे दोनपर्यंत मेट्रो सेवा सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

एका मेट्रोची क्षमता किमान ९०० प्रवाशांची आहे. दर तीन मिनिटांना मंडई येथून प्रवासी स्वारगेट अथवा जिल्हा न्यायालय मेट्रो स्थानकाकडे जातील. त्यामुळे मध्य भागातील मेट्रो स्टेशनवर गर्दी होणार नाही, असे मेट्रो प्रशासनाकडून सांगण्यात आले.देखावे पाहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांनी कसबा पेठ मेट्रो स्थानक येथे उतरावे. तेथून गणपती पाहण्यास जावे. परतीचा प्रवास मंडई मेट्रो स्थानकापासून करावा. त्यामुळे एकाच मेट्रो स्थानकावर गर्दी होणार नाही; तसेच वनाझ ते रामवाडी मार्गिकेवरून प्रवास करणाऱ्यांनी पुणे महापालिका मेट्रो स्थानक येथे उतरून देखावे पाहण्यासाठी जावे, असे आवाहन महामेट्रोकडून करण्यात आले आहे.कसबा पेठ, मंडई मेट्रो स्थानक येथील गर्दी कमी करण्यासाठी जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मार्गावर मेट्रो दर तीन मिनिटांनी चालविण्याचे नियोजन केले जात आहे. त्यासाठी दोन दिवसांपासून चाचण्या घेतल्या जात आहेत, अशी माहिती महामेट्रो, व्यवस्थापकीय संचालक, श्रावण हर्डीकर यांनी दिली

# बनावट औषध ओळखण्यास लवकरच क्यूआर कोडचा वापर

आता ग्राहकांना त्यांनी खरेदी केलेलं औषध सुरक्षित आहे का आणि ते बनावट तर नाही ना, हे लवकरच तपासता येणार आहे. बनावट आणि निकृष्ट औषधांचा वापर रोखण्यासाठी आणि गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी सर्वाधिक विक्री होणाऱ्या औषधांसाठी ट्रॅक अँड ट्रेसप्रणाली सुरू करण्याची सरकारची योजना आहे. या अंतर्गत, पहिल्या टप्प्यात फार्मास्युटिकल कंपन्या ३०० सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या औषधांच्या प्राथमिक उत्पादन पॅकेजिंग लेबलवर बारकोड किंवा क्यूआर कोड प्रिंट चिटकवतील.यामध्ये प्रतिस्ट्रिप १०० रुपयांपेक्षा जास्त एमआरपीसह मोठ्या प्रमाणात विकल्या जाणाऱ्या अँटिबायोटिक्स, कार्डियाक, वेदना कमी करणाऱ्या गोळ्या आणि अँटी-अ‍ॅलर्जिक औषधांचा समावेश असणं अपेक्षित आहे. याबाबतचा ठराव दशकभरापूर्वी घेण्यात आला होता. देशांतर्गत फार्मा उद्योगात आवश्यक तयारी नसल्यामुळे कार्यवाही थांबवण्यात आली.निर्यातीसाठी ट्रॅक आणि ट्रेस यंत्रणाही पुढील वर्षी एप्रिलपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. गेल्या काही वर्षांत बनावट आणि निकृष्ट औषधांची अनेक प्रकरणे बाजारात समोर आली आहेत.अलीकडील एका प्रकरणात, तेलंगणा औषध प्राधिकरणाला थायरॉईड औषध थायरोनॉर्मची गुणवत्ता खराब असल्याचं आढळलं. दुसऱ्या एका घटनेत ग्लेनमार्कच्या ब्लड प्रेशर गोळ्या तेलमा-एचच्या बनावट ड्रग रॅकेटचा पर्दाफाश झाला. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन नुसार, कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये सुमारे १०% वैद्यकीय उत्पादने निकृष्ट किंवा बनावट असतात. एकदा सरकारी उपाययोजना आणि आवश्यक सॉफ्टवेअर लागू झाल्यानंतर ग्राहकांना मंत्रालयाच्या पोर्टलवर (वेबसाइट) एक युनिक आयडी कोड फीड करून औषधाची वास्तविकता तपासता येईल. मोबाइल फोन किंवा मेसेजद्वारेही ते ट्रॅक करता येईल. संपूर्ण फार्मास्युटिकल उद्योगासाठी एकच बारकोड प्रदान करण्यासाठी केंद्रीय डेटाबेस एजन्सी स्थापन करण्यासह अनेक पर्यायांचा अभ्यास केला जात आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# गणेशोत्सव उत्साहात साजरा करा पण, नियम जाणून घ्या काय करावे आणि काय करू नये?

**जनसंचलन/बुलडाणा**

वर्षी प्रमाणे यावर्षी दि. २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत गणेशोत्सव साजरा होत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व शहरात, गावात, खेड्यात सार्वजनिक रस्त्यावर अगर रस्त्याच्या आसपास सार्वजनिक शांतता भंग न होण्याच्या हेतुने गणेशोत्सवानिमित्त होणारे मेळावे, दिंडी अगर मिरवणूकीत भाग घेणाऱ्या लोकांचे नियमनाकरीता मुंबई पोलीस कायदा १९५१ चे कलम ३३,३७ व ४० प्रमाणे निर्बंध घालण्यात आले आहेत, याबाबतचा जाहीरनामा जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांनी जारी केला आहे. जिल्ह्यात दि. २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत (दोन्ही दिवस धरुन) कोणासही श्री गणपती स्थापने प्रित्यर्थ अगर विर्सजना प्रित्यर्थ मेळावे किंवा पालख्या किंवा वाद्यांसहीत मिरवणूक काढावयाची झाल्यास, अगर नाचगाणे किंवा कुस्त्यांचे सामने करावयाचे असल्यास त्या व्यक्तीने संबंधित पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्याकडुन लेखी परवानगी घेणे आवश्यक राहणार आहे. अशी लेखी परवानगी घेतल्याशिवाय गणेशोत्सव कालावधीत कोणत्याही प्रकारची मिरवणूक काढण्यास मनाई आहे. प्रेत यात्रेला मात्र नियम लागू राहणार नाही.ज्यांना परवाने पाहिजे असतील त्यांनी अशी मिरवणूक काढावयाच्या अगोदर लेखी अर्जाद्वारे संबंधित पोलीस ठाण्याच्या ठाणेदार यांच्याकडे विहित नमुन्यात माहिती भरुन देणे आवश्यक आहे. या लेखी अर्जात मुख्य आयोजकाचे पूर्ण नाव व पत्ता, ज्या कारणासाठी परवाना पाहिजे ते कारण, मेळावा अगर मिरवणूकीचे वर्णन व मंडळाचे नांव, कोणकोणत्या ठिकाणी जाण्याकरीता परवाना पाहिजे तो तारीख व वेळ, ज्या रस्त्याने मिरवणूक अगर मेळावा जाणार असेल तो रस्ता, ज्या तारखेचा किंवा वेळेचा परवाना पाहिजे ती तारोख व वेळ, मिरवणूक चालकाचे व सदस्यांचे पूर्ण नाव व पत्ता, मुख्य आयोजकाने मिरवणूकीतील किंवा मेळाव्यातील प्रत्येक व्यक्तीचे योग्य शांत वर्तनाबद्दल तो स्वतः जबाबदार आहे असे अर्जावर लिहून दिले पाहीजे. मिरवणूकीत वापरावयाचे वाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी बुलढाणा यांचेकडून तपासून घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक राहिल. अशा प्रकारची मिरवणूक अगर मेळावा सार्वजनिक जागेतून नेतांना संबंधित व्यक्तीजवळ असा परवाना असावयास पाहिजे व दंडाधिकारी अगर पोलीस अंमलदार यांनी तो पहावयास मागीतल्यास त्यांना दाखवणे बंधनकारक राहणार आहे. श्री गणपती विर्सजनाचे दिवशी मिरवणुक अगर मेळावा रात्री १० वाजेपर्यंत मिळालेल्या परवान्यात नमुद केलेल्या रस्त्यानेच व वेळेनुसार काढण्यात यावी. दुसऱ्या रस्त्याने त्यांना जावू दिले जाणार नाही व वहीवाट अगर इतर सबब ऐकली जाणार नाही. त्या मिरवणुकीमुळे इतर मिरवणूकीस अगर रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. अडथळा झाला तर त्याबद्दल तो मुख्य आयोजक जबाबदार धरला जाईल. मिरवणूक विर्सजन वेळेच्या आत केले पाहीजे. कोणत्याही प्रसंगी मिरवणूक अथवा मेळावा ह्यांनी प्रेतयात्रेला वाट दिली पाहीजे. व्यक्ती, प्रेत अगर त्यांच्या प्रतीमा यांचे सार्वजनिक जागेत प्रदर्शन करण्यास मनाई आहे. गणेशोत्सवाच्या काळात सभ्यता अगर नितिमत्तेत बिघाड होईल किंवा कायद्याविषयी तिरस्कार निर्माण होईल किंवा निरनिराळ्या जमातीतील शांतता धोक्यात येईल असे कोणतेही कृत्य किंवा गैरवर्तन करण्यास मनाई करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जातीय तंटे, बखेडे निर्माण होतील अगर निरनिराळ्या भागात किंवा जमातीत संघर्ष निर्माण होईल असे कोणतेही कृत्य भाषण, जाहीरात प्रदर्शन, अंगविक्षेप, सोंग काढणे यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच विभत्स शब्दांचा उच्चार करु नये किंवा विभत्स सोंग आणू नयेत. कोणास अपमानकारक चिड येण्यासारखे किंवा असे कोणतेही कृत्य करु नये व शांततेचा भंग होईल अशा प्रकारच्या घोषणा करु नये, अगर गैरशिस्त गोंगाट करु नये. ज्याचे बरोबर वाद्य साहित्य, खेळ, दिंड्या, आखाडे, सोंग फलके आहेत अशा लोकांनी रस्त्याने जातांना आजूबाजूस राहणाऱ्या लोकांना त्रास होईल अशा रितीने थांबू नये, अगर गाणे गावू नये आणि ज्यावेळी एखादे जनावर बुजाडण्याचा संभव असेल त्या त्या वेळी अशी जनावरे



तेथून निघून जाईपर्यंत वाद्य वाजविणे एकदम बंद ठेवले पाहीजे. मशीद जवळून मिरवणूक जातांना मशीदीपुढे न थांबता पुढे निघून जावे, रंगाळू नये. मेळावे किंवा मिरवणुक रस्त्याने जात असता किंवा रस्त्याने मेळाव्यातील मुले पदे म्हणू लागली असता अगर रस्त्याने काही वेळ पर्यंत मेळाव्यास उभे राहणे भाग पडले असता मेळाव्याचे अगर मिरवणूकीच्या मुख्य आयोजकाने रस्त्यावरुन गाडी वगैरे वाहनास अडवळा होणार नाही अशी तजविज केली पाहीजे असा अडथळा झाला तर त्या बद्दल तो मुख्य आयोजक जवाबदार धरला जाईल. मेळावा अगर मिरवणूक रस्त्याने जात असतांना त्यातील कोणत्याही इसमाने विशेष परवाण्याशिवाय कोणतेही अग्नीशख, मशाल (टेंभे), तलवार, खंजीर, कट्यार चाकू, काठ्या, वांबू, छोटे दगड, गोफन अगर कोणत्याही प्रकारचे शस्त्र अगर ज्या योगे दुखापत करता येईल असे कोणतेही शस्त्र किंवा पदार्थ घेवून जावू नये अथवा जवळ बाळगू नये ज्यांचे जवळ असे शस्त्र किंवा वस्तू सापडतील त्यांचे जवळून ते घेवून पोलीसांच्या ताब्यात देण्यात येतील. हा जाहिरनामा अंमलात आला असून संबंधितांनी पाळावा. या जाहिरनाम्यातील कोणत्याही शर्तीच्या विरुध्द गुन्हा करणाऱ्यांवर मुंबई पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५, १५२ आणि भारतीय नागरिक न्याय संहीता २०२३ प्रमाणे सुध्दा खटला भरण्यात येईल, असा इशारा देखील देण्यात आला आहे.

# ओबीसी महामंडळाच्या थकबाकीदारांसाठी एक रकमी परतावा योजना

## थकीत व्याजावर ५० टक्के सवलत, 31 मार्च २०२६ पर्यंत संधी

**जनसंचलन/बुलडाणा**

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., मुंबई तर्फे थकीत कर्जदार लाभार्थ्यांसाठी एक रकमी परतावा योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत संपूर्ण थकीत कर्जाची रक्कम एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यांना थकीत व्याज रक्कमेवर तब्बल ५० टक्के सवलत मिळणार आहे. ही योजना ३१ मार्च २०२६ पर्यंत लागू राहणार आहे. बुलढाणा जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्गातील नागरिकांना महामंडळामार्फत स्वयंरोजगाराकरिता अल्प व्याजदराने कर्ज वितरित जिल्हा कार्यालयाकडून वाटप झालेल्या थकीत लाभार्थ्यांना थकीत व्याज रक्कमेवर तब्बल ५० टक्के सवलत देण्यात येणार असून या एकरकमी परतावा योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. लाभार्थ्यांनी थकीत मुद्दल व व्याज रक्कमेचा भरणा करण्यासाठी महामंडळाचे जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलढाणा येथे लाभार्थ्यांनी संपर्क साधावा. तसेच अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०७२६२-२४८२८५ वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

# ग्रीनिज बुक रेकॉर्डसाठी ब्रह्मा कुमारी रक्तदान मेगा कॅम्पेन नाविन्यपूर्ण कार्यक्रम.

**जनसंचलन/बुलढाणा**

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय या संस्थेने २२, २३, २४, २५ ऑगस्ट रोजी एका विशाल रक्तदान शिबिराच्या माध्यमातून १,००,००० युनिट रक्तदान गोळा करण्याचे वचन दिले आहे. या मोहिमेचा राष्ट्रीय शुभारंभ १७ ऑगस्ट रोजी नवी दिल्ली येथे केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांच्या शुभहस्ते झाला आहे . भारत आणि नेपाळ मधील ब्रह्मा कुमारी विद्यालयाच्या ६००० हुन अधिक सेवा केंद्रांवर एकाच वेळी रक्तदान शिबिरे आयोजित केली जातील. हे शिबिर भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, जिल्हा रक्त निर्मिती, जिल्हा सरकारी रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय, रोटरी क्लब, लायन्स क्लब, आयएसबीटीआय आणि सामाजिक सेवा संस्थांच्या सहकार्याने आयोजित केले जाईल. अशा समाज सेवांचे राष्ट्रीय समन्वयक प्रभाव बीके अवतार भाई जी म्हणाले की, सर्व शिबिरांचे गुगल मॅपद्वारे निरीक्षण केले जाईल, ज्यामुळे डेटा संकलन सोपे होईल. बुलढाणा सेवाकेंद्रा तर्फे रक्तदान कार्यक्रम २३ ऑगस्ट २०२५ रोजी ब्रह्माकुमारी विद्यालय, ईश्वरानुभूती भवन, एकता नगर, डॉ .पिंपरकर रुग्णालया शेजारी, येथे सकाळी ९:०० ते दुपारी ३:०० वाजेपर्यंत आयोजित केला जाईल. सरकारी रुग्णालय आणि जिल्हा रक्त निर्मितीला सहकार्य केले जाईल. तरी बुलढाणा शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की सर्वांनी जास्तीत जास्त रक्तदान करून सहकार्य करावे. असे आवाहन ब्रह्माकुमारी आश्रम च्या मुख्य संचालिका ब्रह्माकुमारी उर्मिला दीदी यांनी केले आहे

# फसवणूक झाली,आता आमरण उपोषणाचे हत्यार उपसणार!




**जनसंचलन/बुलढाणा**

मेहकर तालुक्यातील डोणगावस्थित चार सुशिक्षित बेरोजगारांची एका श्रीराम चिटस फायनान्स कंपनीच्या एजंटने चेक व स्वाक्षरी घेऊन परस्पर बँक खात्यातील पैसे काढून घेऊन फसवणूक केली.संबंधितांना तक्रारी करून देखील दखल घेतल्या जात नसल्याने २८ ऑगस्टपर्यंत न्याय न मिळाल्यास २ सप्टेंबर पासून डोणगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. श्रीराम चिटस फायनान्स कंपनीचा एजंट गजानन त्र्यंबक आखाडे व नारायण विश्वनाथ आनकर हे दोघे अवैध सावकारी व आयटीआर, रिटर्न्स आयकर विभागाचे खोटानाटा व्यवसाय करतात. त्यांनी चार सुशिक्षित बेरोजगारांकडून सुलभ कर्ज उपलब्ध करून देण्याच्या नावावर त्यांचा विश्वास जिंकत त्यांच्याकडून दहा- दहा चेक घेतले. आणि बँक खात्यातून परस्पर रक्कम काढून घेऊन, कंपनीचा खोटा आयटीआर, रिटर्न्स देऊन फसवणूक केल्याचा आरोप होतोय. महेश अर्बन डोणगाव बँकेतून बनावट सह्या करून १ लाख ८० हजारांचा टू कॅशचा व्यवहार माझ्या माघारी केल्याचे तक्रारदार संदीप पळसकर यांचे म्हणणे आहे.या संदर्भात दहा संबंधित विभागांना रीतसर तक्रार देऊनही अद्याप तक्रारीची दखल घेण्यात आली नसल्याने २८ ऑगस्टपर्यंत न्याय न मिळाल्यास २ सप्टेंबर पासून डोणगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा मेहकर तहसीलदार यांना एका निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनाच्या प्रतिलिपी संबंधितांना पाठविण्यात आल्या आहे.

# घरकुल योजनेतील गैरव्यवहाराची चौकशी करा!

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

पंचायत समिती अंतर्गत ग्रामीण भागात सुरू असलेल्या घरकुल योजनेत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करून आवास योजनेत गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्याविरुद्ध प्रशासकीय चौकशी लावून कठोर कारवाईची मागणी शिवसेना नेते रवींद्र विठ्ठलराव इंगळे यांनी केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे केली आहे.

या निवेदनात शिवसेना नेते रवींद्र इंगळे यांनी नमूद केले आहे की, देऊळगाव राजा पंचायत समिती अंतर्गत आवास योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात घरकुल योजना राबविली जात आहे. मात्र सदर प्रक्रियेमध्ये शासनाच्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी न करता घरकुलांसाठी निधी वितरीत केला गेला आहे. या योजने च्या दृष्टीने गरजू असलेले खरे लाभार्थी यांना या योजनेचा लाभ न देता आर्थिक देवाण-घेवाण करून नियमात न बसणाऱ्या धन दांडग्या लोकांना घरकुल देण्यात आले आहे. सदर योजनेत शासकीय निमशासकीय कर्मचारी, पंचायत



समिती, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नियमबाह्यरित्या घरकुल देण्यात आले आहे. सदर बाब गटविकास अधिकारी व ग्रामीण अभियंता यांच्या निदर्शनास आणून दिली असता त्यांनी उडवा ओळीची उत्तरे दिल्याचा आरोप रवींद्र इंगळे यांनी सदर निवेदनाद्वारे केला आहे. तालुक्यात झालेल्या घरकुल योजनेतील गैरव्यवहाराची तात्काळ चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध प्रशासकीय कारवाईची मागणी त्यांनी केली आहे. सदर प्रकरणात येत्या ३० ऑगस्टपर्यंत चौकशीला सुरुवात करण्यात आली नाही तर पंचायत समिती कार्यालयाला ताला ठोकू असा इशारा शिवसेना नेते इंगळे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# यंदाच्या गणेशोत्सवात चला हवा येऊ द्या! ची हास्य मेजवाणी!

**जनसंचलन/बुलढाणा**



बुलडाणा अर्बन संस्थेच्या कर्मचारी गणेश मंडळाचे यंदा २४ वे वर्ष आहे. यावर्षी २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत गणेशोत्सव धडक्यात साजरा होणार आहे. दरवर्षी प्रमाणे यावर्षीही गणेश मंडळाच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून बुलढाणेकरांना चला हवा येऊ द्या! ची हास्य मेजवाणी उपलब्ध होणार आहे. प्रत्येक घरातील आवडता कार्यक्रम म्हणजे झी मराठीवर लोकप्रिय असलेल्या चला हवा येऊ द्या हा असुन या कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार २९ ऑगस्ट २०२५ संस्थेचे सहकार विद्या मंदिराचे सांस्कृतिक भवन येथे सायंकाळी ७ वाजता करण्यात आले असून या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण भारत गणेशपुरे, गौरव मोरे,कुशल बद्रिके, अंकुर वाढवे, आणि धनश्री दळवी यांच्यासह झी मराठी फेम कृष्णा मुसळे रसिका जोशी, राजकुमार निंबोकार, श्रध्दा वरणकार हे सर्व कलाकार सादरीकरण करणार आहेत.या भव्य कार्यक्रमाचे आयोजन संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक उपाख्य भाईजी, बुलडाणा अर्बन संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुकेशजी झंवर आणि बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा सौ. कोमलताई सुकेशजी झंवर आणि अनंताभाऊ देशपांडे यांच्या मार्गदर्शनात गणेश मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. नेहमीच्या ताणतणावातुन काही क्षण मुक्ती मिळण्यासाठी सर्वांनी या कार्यक्रमास सहपरिवार उपस्थित रहावे, असे आवाहन गणेश मंडळाच्या वतीने करण्यात आले.

# काम करून घ्यायचे असेल तर आधी पैसे मोजण्याची तयारी ठेवा!

## चिखलीच्या दुय्यम निबंधक कार्यालयातील प्रकार!

**जनसंचलन/ चिखली**

उप निबंधकांच्या टाटाखालील मांजर शिल्लक पैशांसाठी लाळ गळत असून, नागरिकांचे सरळ काम न करता खाबुगिरीसाठी भलतेच चटकल्याचे चित्र चिखली येथील दुय्यम निबंधक कार्यालयात पाहायला मिळत आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. सर्वसामान्य नागरिकांची कामे होत नसल्यामुळे वरिष्ठांनी या प्रकाराकडे वेळीच लक्ष देऊन संबंधितावर कारवाई करण्याची मागणी सुज्ञ नागरिकांतून होऊ लागली आहे. जमीनधारकांना खरेदी विक्रीसाठी दुय्यम निबंधक कार्यालयातून कामकाज पाहिले जाते,आणि सध्याच्या काळात जमीन खरेदी विक्रीसाठी नागरिकांची गर्दी पाहायला मिळते. मात्र, अशातच चिखली तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालयात दलालाशिवाय नागरिकांची कामे होत नसल्यामुळे जमीन खरेदी विक्री करणाऱ्या नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे चित्र आहे. मागच्या अनेक महिन्यापासून हा प्रकार सुरू असून याकडे वरिष्ठ प्रशासनाकडून साफ दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. येथील दुय्यम निबंधक हा जमीन खरेदी विक्रीकरिता महत्त्वाचा विभाग आहे.याकार्यालयात अधिकृत शासकीय कर्मचारी नियुक्त असतांना नियुक्तीपेक्षा अधीक कर्मचारी कामासाठी दिसतात, ही कायद्याची पायमल्ली असल्याचा आरोप होत आहे. कोणत्याही कामासाठी जा पण आधि कर्मचाऱ्यांना भेटा असा येथे अलिखित नियम आहे. या कार्यालयतिल कार्यरत अधिकारी यांची तडकाफडकी बदली करण्यात आली. त्यांच्या जागी नवे




अधिकारी रुजू झाले मात्र कामकाजाची पद्धत आता फारच बिकट झाल्याचा आरोप होत आहे.या ठिकाणी सर्वच कामे दलालांमार्फत होत असल्यामुळे सामान्य नागरिकांची आर्थिक लूट केली जात असल्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. जमीन खरेदी विक्रीसाठी नागरिकांना हजारो रुपये मोजावे लागत आहेत. अधिक मूल्यांकन दाखवून भाव केले जातात असल्याचा प्रकार बेफिकिरपणे सुरू असून याबाबत सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८